ePaper

वर्ष - 6 । अंक - 340 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | गुरुवार, दि.30 मार्च 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# शोकाकूल वातावरणात खासदार गिरीश बापट अनंतात विलीन




आतील पानांत

- खासदार गिरीश बापट अनंतात विलीन
- मालमत्ता कर भरण्यासाठी दोनच दिवस बाकी
- ‘मविआ’त सर्वकाही अलबेल
- कर्नाटकात सत्तापालट!


## टोलवाढीच्या विरोधात महामार्गावर

# ‘आप’चे आंदोलन!

### मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील 18 टक्के टोलवाढीचा निषेध




।पुणे। महाईन्यूज ।

प्रतिनिधी।

**राज्य सरकारने मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर १ एप्रिल २२३ पासून १८ टक्के केलेल्या टोलवाढीच्या विरोधात आम आदमी पार्टीने आंदोलन केले आहे. पिंपरी चिंचवड शहर कार्यकारी अध्यक्ष चेतन बेंद्रे यांच्या नेतृत्वाखाली किवळे येथे महामार्गावर टोलवाढीचा निषेध करण्यात आला. पुणे एक्सप्रेस वेवर टोल वाढल्याने आता प्रवाशांच्या खिशाला झळ बसणार आहे. वैयक्तिक वाहन वापरकर्त्यांना १ एप्रिलपासून १८ टक्के वाढीव टोल टॅक्स मूळे खासगी बस आणि कॅबचे भाडे वाढणार आहे.**

मालवाहतुकदार,कारचालक यांना मोठा भुर्दंड बसणार आहे. २००८ च्या महामार्गशुल्क आकारणी नियमानुसार स्थानिक परिस्थितीनुसार टोल आकारणी केली पाहिजे. महामार्ग निर्मिती प्रकल्प खर्च व देखभाल खर्च यांच्यानुसार टोल वसुली जाचक असता नये. मात्र टोलवसुलीची कंत्राटदार कंपन्यांच्या लाभासाठी टोल दरवाढ केली आहे, असा आरोप संतोष इंगळे यांनी केला आहे.

**आंदोलनामध्ये यांचा सहभाग...**

आंदोलनास संतोष इंगळे, यशवंत कांबळे, मीनाताई चंद्रमणी जावळे, सरोज कदम, ज्योती शिंदे, संतोषी नायर, ब्रह्मानंद जाधव, हारून अन्सारी, राहुल नाईक, संजय मोरे, सचिन पवार, अमर डोंगरे, कमलेश रनवरे, रोहित सरनोबत, अजय द्विवेदी, अशोक शेडगे, दिलीप खुडे, दिलीप कुमार, विनोद सरोज, संजय मोरया, सुरेंद्र कांबळे आणि आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# प्रशासक राजमुळे पिंपरी-चिंचवडकरांची कोंडी!

## नागरिकांची थेट आयुक्तांकडे गाऱ्हाणी!

## पिंपरी महानगरपालिकेत होत नाही पाच वर्षानंतरही दररोजच्या कामाचा निपटारा!






। पिंपरी। महाईन्यूज ।

प्रतिनिधी।

**सध्या राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थात प्रशासकीय राजवट असल्याने अधिकाऱ्यांकडूनच नागरिकांच्या तक्रारींचा निपटारा होणे अपेक्षित आहे. मात्र तो होत नसल्याचे पिंपरी-चिंचवड महापालिकेत दिसून आले आहे. नगरसेवकांची मुदत संपल्याने त्यांच्यामार्फत नागरी समस्या मार्गी लागण्यास गेल्या वर्षभरापासून ब्रेक लागलेला आहे. त्यामुळे प्रशासन तथा अधिकाऱ्यांनी या काळात कामाचा निपटारा करणे अपेक्षित आहे. मात्र, ते नागरिकांच्या तक्रारींची दखलच घेत नसल्याचे पिंपरी चिंचवडकरांची दुहेरी कोंडी झाली आहे.**

पालिकेचे विभागप्रमुख तथा अधिकारीच दखल घेत नसल्याने रहिवासी थेट आयुक्त तथा प्रशासक शेखरसिंह यांच्याकडे आपले गाऱ्हाणे मांडू लागले आहेत.

त्यातून हा गैरप्रकार समोर आला आहे. कार्यालयीन वेळेचेही अधिकारी पालन करीत नसल्यामुळे त्या दिवसाच्या कामाचा निपटारा त्याच दिवशी करण्याचे (झिरो पेन्डसी अँड डेली डिस्पोजल` ) उद्दिष्ट साध्य करण्यास प्रशासनाला अपयश आलेले आहे. नागरिकांच्या तक्रारींची दखलच घेत नसल्याचे पिंपरी चिंचवडकरांची दुहेरी कोंडी झाली आहे.

त्यामुळे भेटीला येणाऱ्यांसाठी नोंदवही ठेवण्यास आणि भेटीच्या

**राज्य सरकारचे आदेश धाब्यावर**

अभ्यांगतांकरिता नोंदवही ठेवून भेटीच्या वेळेचा फलक लावण्याचा आदेश राज्य सरकारने सात वर्षापूर्वी काढलेला आहे. त्यानंतर दोन वर्षांनी `झिरो पेन्डसी अ‍ॅन्ड डेली डिस्पोजल` ही कार्यपद्धती सरकारने अवलंबली. मात्र, हे दोन्ही आदेश धाब्यावर बसविण्यात आले असल्याचे पिंपरी महापालिका प्रशासकांना आढळून आले आहे.ही बाब प्रशासकीय कामकाजाच्या दृष्टीने अशोभनीय़ असल्याचे त्यांनी म्हटले आहे. सायंकाळी चार ते पाच ही वेळ अभ्यांगतांच्या भेटीसाठी राखून ठेवण्याची आणि या कालावधीत इतर बैठका न घेण्याची वा दौरे आयोजित न करण्याची सूचना त्यांनी विभागप्रमुखांना केली आहे. तसेच या आदेशाचे काटेकोरपणे पालन करण्यासही त्यांनी सांगितले आहे.

# खासदार गिरीश बापट अनंतात विलीन

## पुणेकरांनी साश्रु नयनांनी दिला अखेरचा निरोप



। पुणे। महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**पुण्याचे लाकडे खासदार गिरीश बापट अनंतात विलिन झाले. पुण्यातल्या दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात दीर्घ आजारानं निधन झालं. ते 73 वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिवावर पुण्यातल्या वैकुंठ स्मशानभूमीत शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी स्मशानभूमीत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रकाश जावडेकर, मंत्री चंद्रकांत पाटील, पुणे भाजप शहराध्यक्ष जगदीश मुळीक उपस्थित होते. राष्ट्रवादीचे स्थानिक नेतेही उपस्थित होते. राजकीय नेत्यासोबतच पुणेकरांनी साश्रु नयनांनी बापटांना निरोप दिला**

गिरीश बापट हे गेल्या अनेक महिन्यांपासून दुर्धर आजाराशी झुंज देत होते. आज सकाळी त्यांची प्रकृती ढासळली. त्यामुळं त्यांना व्हेंटिलेटरवर ठेवण्यात आलं होतं. दुपारी सव्वा बाराच्या सुमारास त्यांची प्राणज्योत मालवली. पुण्यात तीन टर्म नगरसेवक, पाच टर्म आमदार आणि 2019 सासापासून खासदार अशी त्यांची राजकीय कारकीर्द होती. मनमिळाऊ स्वभाव आणि सर्वसमावेशकता ही त्यांच्या नेतृत्वशैलीची ओळख होती. कॅन्सरसारख्या दुर्धर आजारानं ग्रस्त असूनही गिरीश बापट हे कसबा पेठ पोटनिवडणुकीत व्हीलचेअर बसून भाजपच्या प्रचारात सक्रिय झाले होते. गेल्या महिन्यात कसबा पोटनिवडणुकीच्या प्रचारात गिरीश बापट यांनी भाजप कार्यकर्त्यांशी संवादही साधला होता. त्यावेळी त्यांचं भावनिक आवाहन ऐकून अनेक कार्यकर्त्यांना अश्रू अनावर झाले होते.

पुण्यातील शनिवार पेठेत त्यांचं घर आहे. या घराच्या आवारत अनेक नागरिकांनी गर्दी केली होती. 'गिरीश बापट अमर रहे', अशा घोषणा कार्यकर्ते पाणावलेल्या डोळ्यांनी दिल्या आहेत. गिरीश बापट यांच्या पश्चात पत्नी गिरीजा, मुलगा गौरव आणि सून स्वरदा आणि नात असा परिवार आहे. त्यांचं सांत्वन करण्यासाठी अनेकांची रीघ लागली होती.

> '"ही अतिशय दुख:द बातमी आहे. आपण एक सच्चा, प्रामाणिक आणि निष्ठावंत कार्यकर्ता गमावला आहे. गिरीष बापट हे गेली अनेक वर्ष सक्रीय राजकारणात होते. त्यांच्या कारकीर्द नगसेवकापासून सुरू झाली. पुढे ते मंत्रीही आणि खासदारही झाले. मंत्रीमंडळात काम करताना आम्ही शेजारीच बसत होतो. त्यांच्या निधनाने भाजपाची तर हानी झालीच, पण आपण एक सच्चा लोकप्रतिनिधी गमावला आहे"
>
> - एकनाथ शिंदे , मुख्यमंत्री

> **भाजपाचे पुण्यातील खासदार गिरीश बापट यांचं ७२ व्या वर्षी निधन झालं आहे. प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांच्यावर पुण्यातील रुग्णालयात उपचार सुरू होते. मात्र, त्यांची आज प्राणज्योत मालवली. दरम्यान, त्यांच्या निधनानंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ट्रीटद्वारे भावना व्यक्त केल्या. जमिनीशी नाळ असलेले राजकारणातील उत्तुंग व्यक्तिमत्त्व हरपलं, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली. "भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते, पुण्याचे खासदार गिरीश बापट यांच्या निधनाने जमिनीशी नाळ असलेले आणि राजकारणातील उत्तुंग व्यक्तिमत्त्व आपल्यातून निघून गेले आहे. विकास हाच त्यांच्या राजकारणाचा केंद्रबिंदू होता. पक्षनिष्ठ, पण पक्षापलीकडे जिव्हाळ्याचे संबंध जोपासणारे, सातत्याने जमिनीशी नाळ ठेवणारे, राजकारणातील एक उत्तुंग आणि अष्टपैलू व्यक्तिमत्त्व आपल्यातून निघून गेले आहे"**
>
> - देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री

### पाणावलेल्या डोळ्यांनी दिला कुटुंबियांनी निरोप..

**» उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मंत्री प्रकाश जावडेकर, मंत्री चंद्रकांत पाटील, पत्नी गिरीजा बापट, मुलगा गौरव बापट, सून स्वरदा बापट, बहिण माधुरी गोखले, आमदार उमा खापरे, महेश लांडगे, माजी महापौर मुरलीधर मोहोळ यांनी साश्रु नयनांची बापटांना निरोप दिला. मुलगा आणि सून दोघेही पेशाने वकील आहेत. सून राजकारणात सक्रिय आहे.**

### शरद पवारांनी घेतलं अंत्यदर्शन

**» गिरीश बापट यांची सर्वसमावेशक नेता अशी ओळख होती. त्यामुळे सकाळी त्यांच्या निधनाची बातमी कळताच राष्ट्रवादीचे नेते अंकुश काकडे यांना अश्रु अनावर झाले होते. राष्ट्रवादीचे स्थानिक नेते दिवसभर बापटांच्या निवासस्थानी उपस्थित होते. त्यासोबतच राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांनीदेखील 5 वाजताच्या सुमारास गिरीश बापट यांच्या शनिवार पेठेतील निवासस्थानी जाऊन त्याचं अंत्यदर्शन घेतलं होतं.**

# तुळशीबागेत शुकशुकाट; गिरीश बापट यांच्या निधनानंतर व्यापाऱ्यांचा उस्फूर्त बंद

## खासदार गिरीश बापट यांच्या निधनानंतर गजबलेल्या तुळशीबागेत बंद पाळून आदरांजली वाहिली

। पुणे। महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

खासदार गिरीश बापट यांच्या निधनानंतर गजबलेल्या तुळशीबागेत बुधवारी शुकशुकाट होता. व्यापारी, किरकोळ विक्रेत्यांच्या समस्या सोडविणाऱ्या गिरीशभाऊंचे निधन झाल्याचे समजताच तुळशीबागेसह व्यापारी पेठेतील व्यापारी, किरकोळ विक्रेत्यांनी बंद पाळून आदरांजली वाहिली.

तुळशीबाग, लक्ष्मी रस्ता परिसरात गजबजलेला परिसर म्हणून ओळखला जातो. तुळशीबाग परिसरात खरेदीसाठी कायम गर्दी असते. बुधवारी सकाळी नेहमीप्रमाणे व्यापाऱ्यांनी दुकाने उघडली. दुपारी खासदार गिरीश बापट यांचे निधन झाल्याचे समजताच व्यापारी, किरकोळ विक्रेत्यांनी दुकाने बंद केली. दिवसभर व्यापार बंद ठेवला, असे तुळशीबाग व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष नितीन पंडीत यांनी सांगितले.



# मालमत्ता कर भरण्यासाठी दोनच दिवस बाकी!

## सुट्टीच्या दिवशीसुध्दा कॅश काउंटर्स राहणार सुरु, करआकारणी व करसंकलन विभागाकडून जाहीर

।पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**चालू आर्थिक वर्ष संपण्यासाठी अवघे दोन दिवस बाकी आहेत. त्यामुळे थकित मालमत्ता कराचा भरणा करण्यासाठी आता दोन दिवस रात्री नऊपर्यंत करसंकलन केंद्रे (कॅश काऊंटर्स) सुरु राहणार आहेत. नागरिकांच्या सोयीसाठी सुट्टीच्या दिवशीसुध्दा थकित मालमत्ता कराचा भरणा करण्यासाठी कॅश काऊंटर्स सुरु राहणार असल्याने नागरिकांनी त्याचा लाभ घेण्याचे करआकारणी व करसंकलन विभागाकडून जाहीर करण्यात आले आहे.**

अवैध बांधकामावरील शास्तीमाफीची सवलत ३१ मार्च पर्यंतच असल्याने नागरिकांनी आपला मूळ कराचा भरणा विभागातील कॅश काउंटर्स मध्ये जाऊन व ऑनलाईन स्वरुपात करण्याचे सुध्दा आवाहन करण्यात आले आहे. त्याचबरोबरच नागरिकांनी थकित कर भरुन दररोज वाढणारे विलंब शुल्क टाळावे व सवलतीचा फायदा घ्यावा, असेसुध्दा आवाहन विभागामार्फत करण्यात आले आहे.





> करआकारणी व करसंकलन विभागाने आतापर्यंत 785 कोटींची विक्रमी वसूली केली आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या झिरो टॉलरन्स पॉलिसीनुसार कडक कारवाईमुळे 785 कोटी रुपयांचा टप्पा गाठण्यात आला आहे. तरी नागरिकांनी येत्या दोन दिवसांमध्ये थकित कराचा भरणा करावा. असे आवाहन महापालिकेद्वारे करण्यात येत आहे.
>
> – नीलेश देशमुख,
> सहायक आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

# रिलोकेशन पॉलिसी आणि वेतनवाढ करार उत्साहात!

## विलो मॅथर अ‍ॅण्ड प्लॅट पंप्स प्रा. लिमिटेड चिंचवड - मॅथर अ‍ॅण्ड प्लॅट एम्प्लॉईज युनियन चिंचवड यांच्यामध्ये करार

।पिंपरी।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।



**पिंपरी चिंचवड औद्योगिक नगरीतील विलो मॅथर अ‍ॅण्ड प्लॅट पंप्स प्रा. लिमिटेड चिंचवड आणि मॅथर अ‍ॅण्ड प्लॅट एम्प्लॉईज युनियन चिंचवड यांच्यामध्ये रिलोकेशन पॉलिसी आणि बारावा वेतनवाढीचा करार, शांततामय उत्साहवर्धक आणि खेळीमेळीच्या वातावरणामध्ये 24 मार्च 2023 रोजी पार पडला. सदर करार यशस्वी होण्यासाठी श्रमिक एकता महासंघ महासंघाचे सल्लागार,कामगार चळवळीसाठी आणि कामगारांच्या हितासाठी प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष काम करणाऱ्या सर्व मान्यवरांचे सहकार्य लाभले. संघटनेच्या सर्व सभासदांनी राखलेल्या संयम, अभेद्य एकजूट, केलेले सहकार्य, संघटना आणि संघटनेतील प्रतिनिधीच्यावर ठेवलेला विश्वास यांच्या बळावर हा करार यशस्वीरित्या पार पडला.**

रिलोकेशन पॉलिसी बेनिफिट (रीलोकेशन पॉलिसी म्हणजे जे कामगार चिंचवड प्लांट मधून शिरवळ प्लांट येथे ट्रान्सफर होतील त्यांना रीलोकेशन अलाउन्स मिळेल प्रत्येक महिना)

1) वन टाईम रिलोकेशन अलाउन्स =70,000/-₹,

2) दरमहा रिलोकेशन अलाउन्स म्हणून पगारात मिळणारी रक्कम =5,000/-₹ आणि दिनांक 1 एप्रिल 2023 पासून अतिरिक्त पगार वाढ रक्कम 5,000/-₹

यामधील 50% रक्कम बेसिक मध्ये अशी एकूण 10,000/- एवढी रक्कम रिलोकेशनच्या अनुषंगाने मिळेल.

3)शिरवळ,केसुर्डी, परिसरात ज्या कामगारांना घर घ्यावयाचे आहे, अशा कामगारांना अ‍ॅडव्हान्स म्हणून 1,30,000/-₹ मिळतील आणि सदर रक्कमेची परतफेड 5,000/-₹ प्रति महा पगारातून केली जाईल.

4)ग्रुप टर्म इन्शुरन्स पॉलिसी:- ₹ 15 लाख किंवा 3 टाईम CTC (जे जास्त असेल ते मिळेल.)

5)ग्रुप मेडिकल पॉलिसी:- 3 लाखावरून 4 लाख करण्यात आली आहे

6)शिफ्टिंग लिव्ह :- जे कामगार केसुर्डी- शिरवळ नजीकच्या परिसरात राहण्यासाठी जातील त्यांना तीन दिवसाची शिफ्टिंग लिव्ह मिळेल.

7)बस सुविधा :- चिंचवड ते केसुर्डी शिरवळ प्रकल्पापर्यंत येणे-जाण्यासाठी 12 महिने बस सुविधा उपलब्ध असेल.

जे कामगार केसुर्डी शिरवळ परिसरात राहण्यासाठी जातील किंवा बस सुविधेचा लाभ घेणार नाहीत अशा कामगारांना एक वर्षासाठी दरमहा :- 4,800 ₹ मिळतील.

8) 12 महिन्यानंतर बस सुविधा बंद झाल्यास कामगारांना :- 2500 ₹ एवढी रक्कम प्रतिमहा मिळेल.

### यांची करारावर स्वाक्षरी

सदर करार संपन्न होण्यासाठी श्रमिक एकता महासंघ, महासंघाचे सल्लागार, कामगार चळवळीसाठी आणि कामगारांच्या हितासाठी प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष काम करणाऱ्या सर्व मान्यवरांचे सहकार्य लाभले. अमोल शेळके.(अध्यक्ष), गौतम लोखंडे(जनरल सेक्रेटरी), दत्तू झेंडे, नेताजी गाडे, मानसिंग शिंदे, महेश कदम, निलेश माने, गणेश कानेटकर, विकास करपे आदींनी करारावर स्वाक्षरी केली.

### करार यशस्वी करण्यासाठी व्यवस्थापनाचे सहकार्य

सदर करार यशस्वी करण्यासाठी यामध्ये हेमंत वाटवे, (एम. डी, & सी.ई.ओ.), नितीन आसलकर (व्हॉइस प्रेसिडेंट एच आर), जयंत देशपांडे साहेब, (प्लांट हेड), श्रीकांत शिरोडकर (फायनान्स हेड), श्रीधर जाधव, (डेप्युटी जनरल मॅनेजर एचआर) आदी व्यवस्थापनातील पदाधिकाऱ्यांचे सहकार्य लाभले.


## संपादकीय »

# भरपाईची भाषा

***संयुक्त राष्ट्रांच्या जागतिक हवामान बदलविषयक परिषदेतील चर्चेची ‘नुसत्या हवेतल्या गप्पा’ अशी हेटाळणी होणे टळले, ते केवळ एका मुद्द्यामुळे. तो मुद्दा आहे नुकसान भरपाईचा.***

श्रीमंत देशांनी निदान तत्त्वतः तरी गरीब देशांना भरपाई देण्याचे मान्य केले, ही परिषदेची कमाई म्हणावी लागेल. त्याचे महत्त्व जाणून घेण्यासाठी आधी लक्षात घ्यावी लागेल ती एकूणच जागतिक व्यवस्थेतील सध्याची विषमता. जगापुढे हवामान बदलाला कारणीभूत ठरणाऱ्या गोष्टी टाळणे हे आव्हान आहे. कार्बन डाय ऑक्साईडचे उत्सर्जन रोखणे हे त्यातील सर्वांत प्रमुख. जीवाश्म इंधनांचा वापर करून निर्माण केलेली ऊर्जा वापरून अमेरिका, युरोपातील देशांनी समृद्धीचे सोपान पार केले. दरडोई उत्पन्न वाढवले. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून जागतिक व्यापारातही वर्चस्व मिळवले. त्याची फळे त्यांना मिळाली; पण या प्रक्रियेत पर्यावरणाची जी काही हानी झाली, त्याच्या झळा मात्र सगळ्याच मानवजातीला बसल्या आणि बसत आहेत. जे देश आता कुठे डोके वर काढू पाहात आहेत, आपल्या लोकसंख्येला थोडे बरे जीवनमान मिळवू देऊ पाहात आहेत, त्यांना जेव्हा जागतिक परिषदेत श्रीमंत देश कार्बन उत्सर्जन रोखण्याचे ब्रह्मज्ञान सांगू लागतात, तेव्हा प्रतिक्रिया येणे साहजिकच म्हटले पाहिजे. दरडोई कर्ब उत्सर्जनाचे आकडे पाहिले तर ही तफावत स्पष्ट होते. युरोपीय देशांचे दरडोई कर्ब उत्सर्जन १०.५ टन, अमेरिकेचे २३ टन तर भारताचे फक्त दोन टन. खच्चून भरलेल्या रेल्वेगाडीत जागा मिळविण्यासाठी धडपडणारा बाहेर राहिलेल्यांविषयी तोपर्यंतच सहानुभूती बाळगतो, जोपर्यंत त्याला आता प्रवेश मिळत नाही. पण एकदा का प्रवेश मिळाला, की नव्याने आता कुणी येऊ नये, असे त्याला वाटू लागते. पाश्चात्त्य जगतातील अनेक देशांचा अशा प्रकारचा दृष्टिकोन असल्याने पर्यावरणाच्या बाबतीतील जागतिक उद्दिष्टे साध्य करण्यात मतभेदांचा अडथळा येऊ लागला. याविषयीच्या मंथनातून गरीब देशांना भरपाई मिळाली पाहिजे, अशी मागणी तीन दशकांपूर्वी पहिल्यांदा मांडली गेली. आजवर तरी या मागणीला वाटाण्याच्या अक्षता लावल्या गेल्या होत्या. अलीकडच्या काळात पूर, दुष्काळ, चक्रीवादळे यासारखे हवामान बदलाचे जे दुष्परिणाम तीव्रतेने समोर येत आहेत, ते पाहता या मागणीने उचल खाल्ली. इजिप्तमधील ताज्या परिषदेत श्रीमंत राष्ट्रांनी त्यामागची भूमिका निदान तत्त्वतः मान्य केली, ही गोष्टदेखील थोर झाली म्हणायची! आता मुद्दा आहे तो तपशीलाचा. भरपाईसाठी निधी उभा करण्यविषयी अद्याप काही रचना ठरलेली नाही. ती ठरवणे, त्याप्रमाणे निधी उभा करणे आणि योग्य ती भरपाई गरीब राष्ट्रांना मिळणे ही पुढची उद्दिष्टे आहेत आणि त्यात कसोटी लागेल.

# गोवरापासून धडा घेणार का?






गोवरामुळे आतापर्यंत नऊ निष्पाप बाळांचे प्राण गेले आहेत. गोवरामुळे मृत्यू होऊ शकतो, ही शक्यता मागील काही दशकांमध्ये वेगाने झालेल्या लसीकरणामुळे संपली होती. मात्र, हाच संसर्ग आता या बाळांच्या जिवांवर बेतला आहे. कोणत्याही व्यवस्थेमध्ये मुलांचा मृत्यू ही अत्यंत गंभीर बाब असते. त्यात आकड्यांची लपवाछपवी करण्यापेक्षा रुग्णसंख्या, मृत्यूचे आकडे व संसर्गाची स्थिती यासंदर्भात यंत्रणांनी अत्यंत पारदर्शक माहिती दिली, तर सामान्यांचा या यंत्रणेवर असलेला विश्वास अधिक वाढतो. करोनासारख्या संसर्गाच्या साथीमध्ये याच शहरात हजारो माणसे मेली, तितकीच मृत्यूवर मात करून परत आली. पालिकेने या साऱ्याचा लेखाजोखा स्पष्टपणे मांडला होता. त्यात लपाछपी नव्हती. आरोपप्रत्यारोप, व्हिडीओचे व्हायरल राजकारण अशा अनेक पातळ्यांवर तेव्हाही यंत्रणेला तोंड द्यावे लागले. पण, त्यांनी कच खाल्ली नाही. गोवर संसर्गाच्या या संकटांशी दोन हात करण्यासाठी तीच हिंमत, तेच नियोजन व पारदर्शकता असण्याची गरज आहे.

मुंबईतील सर्वात मोठी झोपडपट्टी म्हणून धारावीकडे पाहिले जाते. करोना संसर्गाच्या काळामध्येही इथे संसर्गाचा फैलाव होऊ नये म्हणून यंत्रणा देव पाण्यात घालून बसली होती. तरीही हा उद्रेक झालाच. तो जितका धारावीत होता तितकाच तो एम वॉर्डमध्येही होता. मागील काही वर्षांत एम वॉर्डला ‘मिनी धारावी’चे स्वरूप येते आहे. देवनार डम्पिंगची संपलेली क्षमता, त्यावरील कचऱ्याच्या अर्थकारणावर अवलंबून असलेली कुटुंबे, येथील गुन्हेगारी, हातावर पोट असलेला मोठ्या प्रमाणात या वस्त्यांमध्ये राहायला आलेला स्थलांतरित कामगार, दाटीवाटीची घरे आणि त्यात कोंबलेली कुटुंबे. कुटुंबनियोजनाचा अभाव, हाताशी एक मूल असताना गर्भात दुसरे वाढवणारी आई... असा जगण्याचा विचित्र तिढा आहे. आता गोवराचा संसर्ग वाढल्यानंतर या मुद्द्यांवर चर्चा सुरू झाली. या समूहाचे जगणे आतापर्यंत कुणाच्या खिजगणीत नव्हते. अस्तित्वासाठी असलेली लढाई, ड्रग्जचे अड्डे, कचऱ्यावरून होणाऱ्या हाणामाऱ्या, त्यातले अंतर्गत राजकारण, अवैध व्यवसाय या साऱ्याचा इथल्या माणसांच्या जगण्यावर आणि यंत्रणेवरही दाब आहे. मुंबई शहराच्या केंद्रबिंदूवर राहणारी ही माणसे आसपासच्या सगळ्या त्रिज्यांपासून तुटलेली आहेत. लसीकरणासाठी येथील लोक तयार होत नाही, असा युक्तिवाद आरोग्ययंत्रणेकडून केला जातो. त्याला प्रत्युत्तर देताना ही माणसे आरोग्याच्या पुरेशा सुविधा मिळत नाहीत असे सांगतात. रस्त्याच्या कडेला असलेल्या वस्त्यांमध्ये आरोग्यसर्वेक्षण पूर्ण होतात. आतल्या कोंदट वातावरणातील मुले तशीच सुटून जातात. लसमात्रा घेण्यापूर्वी मुलांना गोवर का झाला हे शोधण्याचे आव्हान आता पालिकेपुढे आहे.

कुपोषण, अंधश्रद्धा, खालावलेली रोगप्रतिकारशक्ती, कुटुंबनियोजनाचा अभाव अशी अनेक कारणे गोवरमृत्यूसाठी पुढे येत आहेत. करोनासंसर्गाच्या काळात नियमित लसीकरणाचा कार्यक्रम पूर्ण ढेपाळला. पण याच काळात कुटुंबनियोजनाच्या सुविधा एम वॉर्डसारख्या प्रभागामध्ये उपलब्ध नव्हत्या. पस्तीशी-चाळीशी पार केलेल्या, दोन-तीन मुलांच्या मातृत्वाची जबाबदारी असलेल्या अनेक स्त्रियांना पुन्हा गर्भारपणाचा भार पेलावा लागला. शून्य ते ११ महिने या वयोगटातील २७ बालकांना गोवराचा संसर्ग झाला आहे. तर एक ते चार वयोगटामध्ये ६४ बालकांना गोवराची लागण झाली आहे. या बाळांच्या जन्माचा कालावधी हा या संसर्गाच्या काळातला आहे. एम वॉर्डसारखी स्थिती असलेल्या मुंबईतल्या कोणत्याही परिसरातील सामान्यांना एकूण वैद्यकीय उपचाराची सुविधा सहजपणे का मिळत नाही, याचाही गांभीर्याने विचार व्हायला हवा. गोवराने उपस्थित केलेले हे प्रश्न केवळ वैद्यकीय नाहीत, तर त्यात एकमेकांमध्ये गुंतलेले अनेक पेच आहेत.

# औषधावरच औषध शोधण्याची वेळ...

**‘डॉक्टर, मला एका दिवसात बरं करा, स्ट्राँग औषध द्या,’ असा आग्रह आपल्यापैकी अनेक जण अनेकदा करतात. पण ही स्ट्राँग औषधेच भविष्यात गंभीर गुंतागुंत निर्माण करणार नाहीत ना?**

कोविडसारखी काही वैश्विक संकटे झंझावातासारखी येतात, जग दणाणून सोडतात, पण काही जागतिक समस्या मात्र हळूहळू वाटचाल करत असतात. २०५० ला अमुक होणार, २०३० ला तमुक होईल असे वाचनात आले तरी आपण तितकेसे गांभीर्याने घेत नाही. आज फार काही बिघडत नाही, पुढचे पुढे पाहू, असे वाटून खडबडून जागे होत नाही. अशा समस्यांची माहिती असते, पण महती माहीत नसते. अशाच दोन समस्या, म्हणजे जागतिक हवामान बदल आणि अँटिबायोटिक प्रतिरोध. या दोन्ही विषयांवर नोव्हेंबर महिन्यात सर्वाधिक चर्चा होत आहे आणि होणार आहे. संयुक्त राष्ट्रांतर्फे ६ ते १८ नोव्हेंबरदरम्यान इजिप्त येथे आयोजित करण्यात आलेल्या हवामान बदलविषयक शिखर परिषदेत (कॉप २७) या समस्येचा आढावा घेण्यात आला. १८ ते २४ नोव्हेंबरदरम्यान जागतिक अँटिबायोटिक (प्रतिजैविक) जनजागरण सप्ताह साजरा करण्यात येत आहे. प्रतिजैविक प्रतिरोध ही एक




छुपी मात्र गंभीर साथ आहे आणि ती नकळत आपल्या दाराशी येऊन उभी ठाकली आहे. सूक्ष्म जंतू प्रबळ होत आहेत आणि प्रतिजैविके निष्प्रभ ठरत आहेत. जंतुप्रादुर्भाव नियंत्रण कठीण होत आहे आणि बरीच प्रतिजैविके त्यांच्या अस्तित्वाची लढाई हरत आहेत. जगात २०१९ मध्ये १३ लाख रुग्ण हे थेट बंडखोर जंतुप्रादुर्भावाने मृत्युमुखी पडले. हे प्रमाण मलेरिया (६.५ लाख मृत्यू) किंवा एड्स (८.५ लाख मृत्यू) पेक्षा जास्त आहे.

प्रतिजैविक प्रतिरोध हा मानवजातीसाठीचा एक जागतिक धोका आहे. यासंदर्भातील प्रबोधनासाठी जागतिक आरोग्य संघटनेने २०१५ पासून दर नोव्हेंबरमध्ये जागतिक प्रतिजैविक जनजागरण सप्ताह आयोजित करण्यास सुरुवात केली. हे किती विचित्र आहे पाहा- औषधांचा शोध, विकास, उपयोग मानवाला वाचण्यासाठी, पण आज आटापिटा करावा लागतोय ते एका प्रकारच्या औषधाला वाचविण्यासाठी. हे वैद्यकीय इतिहासात अभूतपूर्व आहे. हा खटाटोप नेमका का करावा लागत आहे? तर मानवी चुकांमुळे उद्भवलेल्या परिस्थितीमुळे.

मानवावरील उपचारांत आणि अन्नोत्पादक प्राण्यांमध्ये वजनवाढीसाठी व जंतुप्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिजैविकांचा अतिरेकी वापर होत आहे. विविध कारणांमुळे पर्यावरणात जागोजागी प्रतिजैविकांचे अंश साठत गेले आहेत. याचा एकत्रित परिणाम म्हणजे आज समोर ठाकलेली प्रतिजैविक प्रतिरोधाची समस्या. मानव, प्राणी, वनसंपत्ती, अन्न, जमीन, पाणी हे सारे काही परस्परांशी जोडलेले आहे. त्यामुळे प्रतिजैविकांचा गैरवापर कुठेही झाला तरी संपूर्ण परिसंस्थेवर त्याचा दुष्परिणाम होतो.

## ।। अभंगवाणी ।।



एका जिवें आतां जिणें जालें दोहीं ।
वेगळीक कांहीं नव्हे आतां ॥१॥
नारायणा आम्हां नाहीं वेगळीक ।
पुरविली हे भाक सांभाळिली ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# ‘मविआ’त सर्वकाही अलबेल!

## संसदेतील काँग्रेसच्या कार्यालयामध्ये खासदार संजय राऊत आणि राहुल गांधी यांची भेट झाली

। नवी दिल्ली। महाईन्यूज ।

**: राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या सल्ल्यानंतर काँग्रेस नेतृत्वाने स्वातंत्र्यवीर सावरकरांवरील टीकेवरून नमती भूमिका घेतल्याने महाविकास आघाडीतील वाद शमल्याचे मानले जाते. संसदेतील काँग्रेसच्या कार्यालयामध्ये खासदार संजय राऊत आणि राहुल गांधी यांची भेट झाली. याभेटीदरम्यान विविध मुद्यांवर चर्चा झाल्याचे कळते. राऊत यांनी यानंतर केलेल्या ट्विटमध्ये आघाडीमध्ये ‘ऑल ईज वेल’ असल्याचे सूचक वक्तव्य केले आहे.**

राऊत यांनी त्यांच्या ट्विटमध्ये म्हटले आहे की, “श्रीमती सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांची आज भेट झाली. अनेक महत्वाच्या विषयांवर सविस्तर चर्चा झाली. सर्व काही अलबेल आहे. चिंता नसावी.” राऊत यांच्या भेटीनंतर राहुल यांनी माध्यमांशी चर्चा करणे टाळले.

मानहानीच्या खटल्यामध्ये काँग्रेसचे वरिष्ठ नेते राहुल गांधी यांना शिक्षा ठोठावण्यात आल्यानंतर त्यांची खासदारकी रद्द झाल्याने केरळमधील वायनाड या लोकसभा मतदारसंघामध्ये पोटनिवडणूक लागण्याची शक्यता वर्तविली जात होती.

एकीकडे काँग्रेसविरोधकांनी निवडणुकीसाठी कंबर कसली असतानाच प्रत्यक्ष आयोगाला मात्र याबाबत फारशी घाई नसल्याचे दिसून येते. गुजरात न्यायालयाच्या निकालाला आव्हान देण्यासाठी राहुल यांच्याकडे एक महिन्याचा कालावधी आहे. तूर्त फेब्रुवारीपर्यंत रिक्त झालेल्या मतदारसंघांबाबतच निर्णय घेण्यात आल्याचे मुख्य निवडणूक आयुक्त राजीवकुमार यांनी सांगितले. ते म्हणाले की, “ सुरतमधील न्यायालयाने राहुल यांना दाद मागण्यासाठी ३० दिवसांचा कालावधी दिला असून आम्ही कोणत्याही प्रकारची घाई करणार नाही, न्यायालयाच्या निकालाची वाट पाहू.

न्यायालयाच्या निकालानंतरच योग्य तो निर्णय घेण्यात येईल. कायद्यानुसार २३ मार्च रोजीच वायनाड लोकसभेची जागा रिक्त झाल्याची अधिसूचना काढण्यात आली असून या ठिकाणी सहा महिन्यांच्या आत निवडणूक घेणे गरजेचे आहे. संबंधित खासदाराकडे एक वर्षापेक्षाही कमी कालावधी राहिला असेल तर त्या ठिकाणी निवडणूक घेण्यात येत नाही.



### न्यायालयाच्या निकालानंतरच योग्य तो निर्णय

**»न्यायालयाच्या निकालानंतरच योग्य तो निर्णय घेण्यात येईल. कायद्यानुसार २३ मार्च रोजीच वायनाड लोकसभेची जागा रिक्त झाल्याची अधिसूचना काढण्यात आली असून या ठिकाणी सहा महिन्यांच्या आत निवडणूक घेणे गरजेचे आहे. संबंधित खासदाराकडे एक वर्षापेक्षाही कमी कालावधी राहिला असेल तर त्या ठिकाणी निवडणूक घेण्यात येत नाही. वायनाडच्या बाबतीत विचार केला तर राहुल यांच्याकडे वर्षापेक्षा अधिक काळ असल्याचे दिसून येते.”**

# 33 लाखांचा धान्य घोटाळा!

## तत्कालीन तहसीलदारसह 20 लोकांवर गुन्हा दाखल

। हिंगोली । महाईन्यूज ।

**हिंगोली जिल्ह्यात 2019 साली जानेवारी ते जुलै या कालावधी दरम्यान झालेल्या स्वस्त धान्य घोटाळा प्रकरणी अखेर तत्कालीन तहसीलदार यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तीन वर्षांपूर्वी हिंगोलीत झालेल्या स्वस्त धान्य घोटाळा प्रकरणी 33 लाख रुपये वसुलीपात्र रक्कम न भरल्याने अखेर तत्कालीन तहसीलदार गजानन शिंदे आणि स्वस्त धान्य दुकानदार अशा एकूण वीस लोकांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

हिंगोली पोलिसात मंगळवारी रात्री उशिरा या प्रकरणी फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. परिविक्षाधीन तहसीलदार असलेल्या हिमालय घोरपडे यांच्या तक्रारीवरून हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तीन वर्षांपूर्वी म्हणजेच 2019 मध्ये हिंगोली तहसील कार्यालयाच्या पुरवठा विभागात घोटाळा झाल्याचे समोर आले होते. जानेवारी ते जुलै 2019 या कालावधीत ऑफलाईन धान्य वाटप करताना स्वस्त धान्य दुकानदारांना अतिरिक्त धान्याचे वाटप केल्याचा प्रकार उघडकीस आला होता. त्यामुळे या सर्व प्रकरणात चौकशी करून घोटाळ्यात सहभागी असलेल्या लोकांना पुरवठा विभागाने नोटीस देऊन अतिरिक्त वाटप झालेल्या धान्याची रक्कम भरण्याच्या सूचना दिल्या होत्या. दरम्यान नोटीस आल्यावर काही लोकांनी रक्कम भरणा देखील केली. परंतु यातील 33 लाख रुपयांची वसुलपात्र रक्कम भरण्यात आली नाही. त्यामुळे नोटीस देऊनही वसुलपात्र रक्कम भरण्यात न आल्याने याप्रकरणी बुधवारी पहाटे हिंगोली शहर पोलिस ठाण्यात 20 जणांविरूद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे. तर पोलिसांकडून या प्रकरणात तपास करण्यात येत आहे.



### यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला...

**» या प्रकरणी हिंगोली तहसीलचे परिविक्षाधिन तहसीलदार हिमालय घोरपडे यांच्या फिर्यादीवरून तत्कालीन तहसीलदार गजानन शिंदे, तत्कालीन अव्वल कारकून कैलास वाघमारे, तत्कालीन गोदामपाल इम्रान पठाण, तत्कालीन अव्वल कारकून बी.बी. खडसे, रास्तभाव दुकानदार रेखा प्रकाश पाईकराव (माळसेलू), पी.आर. गरड (राहोली), ज्ञानेश्वर रामराव मस्के (सिरसम बु.), गोविंदा पुंजाजी मस्के (तिखाडी), गणाजी मुकिंदा बेले (खेर्डावाडी), विनोद लक्ष्मण आडे (पेडगाव1), हिंगोली तालुका विक्री संघ क्र. 1चे चालक, रास्तभाव दुकानदार एस.के. चव्हाण (पळसोना), डी.एम. शिंदे (सावरगाव बं), मिलिंद निवृत्ती पडघन (जुमडा म.), डी.बी. चव्हाण (मौजा), गजानन नामदेव गडदे (गाडीबोरी), अनुसया अंबादास गाडे (वैजापूर), गोपाल तापडीया (भिरडा), डी.बी. चव्हाण (हिरडी), पतिंगराव मस्के (वराडी) यांच्यावर हिंगोली शहर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे**

# नाशिक जिल्ह्यात सर्वाधिक अवकाळी पावसाची नोंद

। मुंबई । महाईन्यूज ।

सद्यस्थितीत नाशिक शहरासह जिल्ह्यातील वातावरण काही अंशी निवळले असले तरीही मार्च महिन्याच्या पहिल्या दुसऱ्या आठवड्यात नाशिक जिल्ह्याला अवकाळी पावसाने झोडपून काढले आहे. त्यामुळे शेतीपिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान देखील झाले. राज्यात सर्वाधिक अवकाळी नाशिक जिल्ह्यात पडल्याचे हवामान विभागाच्या आकडेवारीतून समोर आले आहे.

यंदाच्या वर्षात शेतकऱ्यांना अनेक संकटांचा सामना करावा लागला. शेतीमालाला भाव मिळत नसताना दुसरीकडे अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले. नाशिक शहरासह जिल्ह्यात अवकाळी पावसाने सलग आठ दिवस हजेरी लावत शेतकऱ्यांना दुहेरी संकटात पाडले. म्हणजेच मागील आठवड्यापर्यंत वातावरणात गारवा जाणवत होता. मात्र आठवडाभर सुरू असलेल्या अवकाळी पावसामुळे आणि वातावरण बदलामुळे शेतकऱ्यांच्या तोंडचे पाणी पळाले. अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे शेत पिकांचे मोठे नुकसान झाले. मागील 25 दिवसांत



राज्यात सर्वाधिक अवकाळी पाऊस नाशिक जिल्ह्यात झाला असून सुमारे 38.6 मिमी इतका पाऊस पडल्याची नोंद हवामान खात्याने केली आहे.

नाशिक जिल्ह्याला अवकाळी पावसाचा मोठा फटका बसला असून जिल्ह्यात 1 मार्चपासून 25 मार्चपर्यंत 38 मिमी इतका पाऊस पडला. राज्यात इतकी नोंद कुठल्याही जिल्ह्यात अद्याप झालेली नाही, यामुळे शेत पिकांचे नुकसानदेखील नाशिकमध्ये मोठ्या प्रमाणावर झाले आहे. शेतकऱ्याच्या हाताशी आलेले पीक डोळ्यांदेखत गेल्याने बळीराजा हादरला. 16 मार्च ते 20 मार्च या कालावधीत अवकाळी पावसाने जोरदार तडाखा दिला. विजांचा कडकडाट अन् गडगडाटासह झालेल्या वादळी पावसाने शेतमालाचे मोठे नुकसान झाले. या कालावधीत जिल्ह्यातील काही तालुक्यात गारपीट देखील झाली होती. आतापर्यंत जिल्ह्यात 38.6 मिमी इतका पाऊस पडल्याची नोंद झाली.

# कर्नाटकात सत्तापालट?

## काँग्रेस बाजी मारणार?, कर्नाटक विधानसभा निवडणुकीत भाजपाला फटका बसण्याची शक्यता

।नवी दिल्ली। महाईन्यूज ।

**कर्नाटक विधानसभा निवडणुकीचे बिगुल वाजला आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने बुधवारी या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. या पार्श्वभूमीवर अनेक वृत्तवाहिन्यांनी या निवडणुकीबाबत ओपिनिअन पोल देखील जारी केले आहेत. एबीपी या वृत्तवाहिनीने सी-व्होटरच्या सहकार्याने घेतलेल्या ओपिनियन पोलनुसार, यावेळी कर्नाटक विधानसभा निवडणुकीत भाजपाला मोठा फटका बसण्याची शक्यता आहे.**

एबीपी – सी व्होटर ओपिनियन पोलनुसार यावेळी कर्नाटकमध्ये भाजपाला विधानसभेच्या 68 ते 80 जागांवर समाधान मानावे लागणार आहे. राज्यात काँग्रेस सर्वाधिक जागा जिंकणारा पक्ष ठरू शकतो. कर्नाटकात काँग्रेसला 115 ते 127 जागा मिळू शकतात. तर, कुमारस्वामी यांच्या जेडीएसला 23 ते 35 जागा मिळू शकतात. ओपिनियन पोलमध्ये इतर पक्षांनाही शून्य ते दोनच्या दरम्यान जागा मिळण्याचा अनुमान व्यक्त करण्यात आला आहे.



एबीपी – सी व्होटर ओपिनियन पोलनुसार, यावेळी कर्नाटकमध्ये भाजपला विधानसभेच्या 68 ते 80 जागांवर समाधान मानावे लागणार आहे. राज्यात काँग्रेस सर्वात मोठा पक्ष म्हणून उदयास येऊ शकतो. कर्नाटकात काँग्रेसला

### ओपिनियन पोलमध्ये काँग्रेसला सर्वाधिक व्होट

» एबीपी न्यूज आणि सी व्होटरच्या ओपिनियन पोलमध्ये भाजपाला कर्नाटकमध्ये 35 टक्के मते मिळण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. व्होट शेअरबाबत काँग्रेस हा सर्वात मोठा पक्ष राहण्याचा अंदाज आहे. राज्यातील एकूण मतांपैकी 40 टक्के मते काँग्रेसला मिळू शकतात. कुमारस्वामी यांच्या जेडीएसला 18 टक्के तर इतर पक्षांना 7 टक्के मते मिळण्याची अंदाज आहे.

115 ते 127 जागा मिळू शकतात तर कुमारस्वामी यांच्या जेडीएसला 23 ते 35 जागा मिळू शकतात. ओपिनियन पोलमध्ये इतर पक्षांनाही शून्य ते दोनच्या दरम्यान जागा मिळण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. कर्नाटकमध्ये 2018 साली झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपने 104 तर, काँग्रेसने 78 जागा जिंकल्या होत्या. कुमारस्वामी यांचा जेडीएस 37 जागांसह राज्यात तिसऱ्या क्रमांकावर होता. कर्नाटकात बसपा आणि केपीजेपीला प्रत्येकी एक जागा आणि एक अपक्ष विजयी झाला होता.

# पंजाबात अमृतपाल सिंगला घेरलं?

## सुवर्ण मंदिरात आत्मसमर्पण करण्याची शक्यता

। लंडन। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**खलिस्तान समर्थक आणि ‘वारिस पंजाब दे’चा प्रमुख अमृतपाल सिंग अद्यापही फरार आहे. पंजाब, दिल्ली, हरियाणाची पोलीस अमृतपाल सिंगचा शोध घेत आहेत. अशात महत्वाची घडामोड समोर आली आहे. अमृतपाल सिंग हा पंजाबमध्येच असल्याचं सांगण्यात येत आहे. अमृतपाल सुवर्ण मंदिरात अकाल तख्तवर जाऊन आत्मसमर्पण करू इच्छित असल्याचं सांगितलं जात आहे. त्या पार्श्वभूमीवर पंजाब पोलिसांनी सुवर्ण मंदिराच्या परिसरातील सुरक्षेत वाढ केली आहे.**



अमृतपाल सिंग एका आंतरराष्ट्रीय माध्यमाला मुलाखत देण्यासाठी जालंधरला जात होता. पहिल्यांदा संपूर्ण प्रकरणाची माहिती द्यावी आणि नंतर पंजाब पोलिसांकडे आत्मसमर्पण करावं, असा अमृतपाल सिंगचा प्लॅन होता. पण, याची माहिती पंजाब पोलिसांना आधीच मिळाल्याने अमृतपालचा प्लॅन फसला. मंगळवारी अमृतपाल सिंग होशियारपूर येथे लपल्याची माहिती पंजाब पोलिसांना मिळाली होती. फगवाडा येथे एका अज्ञात कारमध्ये अमृतपाल सिंग असल्याची माहिती मिळाल्यावर पोलिसांनी पाठलाग केला. पण, मरनिया येथील गुरूद्वाऱ्याजवळ कारमधील लोक गाडी सोडून फरार झाले. यानंतर

### कोण आहे अमृतपाल सिंग?

» अमृतपाल सिंग हा ‘वारिस पंजाब दे’ संघटनेचा प्रमुख आहे. काही दिवसांपूर्वीच तो दुबईतून भारतात आला आहे. ‘वारिस पंजाब दे’ संघटनेची स्थापन पंजाबी अभिनेता दीप सिद्धू याने केली होती. दीप सिद्धू याच्या मृत्यूनंतर अमृतपाल सिंगने ‘वारिस पंजाब दे’ संघटनेवर कब्जा केला. अमृतपाल सिंगचे दहशतवादी संघटना आयएसआयशी संबंध असल्याचं सांगितलं जात आहे.

मरनिया गाव आणि आसपासच्या परिसरात मोठ्या प्रमाणात पोलीस तैनात करण्यात आले. तसेच, अमृतपालला पकडण्यासाठी पोलिसांनी मंगळवारी रात्री ‘घर ते घर’ तपासणी केली.



# अदानींवर प्रश्न उपस्थित केल्यामुळे भाजपनं षडयंत्र रचलं

। नवी दिल्ली। महाईन्यूज । प्रतिनिधी।

काँग्रेस नेते राहुल गांधी यांची खासदारकी रद्द झाल्यानंतर काँग्रेस नेत्यांकडून प्रचंड प्रमाणात रोष व्यक्त करण्यात येत आहे. यावर महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेस नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी भाष्य करत राहुल गांधींनी अदानींवर प्रश्न उपस्थित केल्यामुळे भाजपनं षडयंत्र रचलं, असं मोठं वक्तव्य पृथ्वीराज चव्हाण यांनी केलं आहे.

काँग्रेसने पत्रकार परिषद घेतली. यावेळी पृथ्वीराज चव्हाण म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारने राहुल गांधींवर ज्याप्रकारे कारवाई केली आहे. त्याप्रकारचं उत्तम उदाहरण तुम्हाला लोकशाहीत सापडणार नाही. भाजपचं सरकार विशेषत: पंतप्रधान नरेंद्र मोदी का घाबरले आहेत?, त्या मुद्द्यांना काँग्रेस जनतेच्या समोर ठेवण्याचा प्रयत्न करत आहे. हे मुद्दे थांबणारे नाहीत, तर २०२४ च्या निवडणुकीतही हेच मुद्दे उपस्थित केले जातील, असं पृथ्वीराज चव्हाण म्हणाले.

**भारत जोडो यात्रेला भाजप घाबरलं**

राहुल गांधींच्या भारत जोडो यात्रेला संपूर्ण जनतेतून मोठ्या प्रमाणात प्रोत्साहन मिळालं

### अदानींवर प्रश्न विचारल्यामुळे खासदारकी रद्द

» राहुल गांधी यांचे सदस्यत्व रद्द करण्यात आले आहे. याचे कारण राहुल गांधी यांनी मोदी आणि अदानी यांच्यातील संबंधांवर प्रश्न विचारला. 20 हजार कोटींच्या मोजणीबाबत प्रश्न विचारण्यात आले होते. हे सर्व प्रश्न विचारले जाऊ नये, म्हणूनच राहुल गांधींचे सदस्यत्व रद्द करण्यात आले आहे, परंतु आम्ही प्रश्न विचारत राहू, असं देखील चव्हाण म्हणाले.

# 'तुम्ही उर्फीला काहीही बोलू नका, ती चांगलीच!



बॉलीवूडची बेबो कधी काय बोलले हे सांगता येत नाही. ति ला । जे वाटलं ते बिनधास्तपणे बोलायचच हे तिला माहिती आहे. त्यामुळे आपल्याला कुणी ट्रोल करते याचा तिला काही फारसा फरक पडत नाही. बॉलीवूडची फिटनेस फ्रीक म्हणून देखील करिनाच्या नावाचा उल्लेख करावा लागेल. आता करिनानं उर्फीची बाजू घेतल्याचे दिसून आले आहे.उर्फी ही नेहमीच तिच्या अतरंगी फॅशनमुळे चर्चेत राहिलेली सेलिब्रेटी आहे. उर्फीनं घरातील बऱ्याचशा वस्तुंचा वापर हा तिच्या फॅशनसाठी केल्याचे दिसून आले आहे. अशातच उर्फीच्या वेगवेगळ्या फॅशनमुळे ती चाहत्यांच्या प्रतिक्रियेचा विषय झालेली आहे.



# सलमानला गोल्डी ब्रारनेच दिलीय मारण्याची धमकी?

अभिनेता सलमान खानला जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. त्यानंतर सलमान जास्तच चर्चेत आला. त्यांच्या सुरक्षेतही पोलिसांना वाढ केली आहे. सलमानला सार्वजनिक ठिकाणी जाण्याची मनाई करण्यात आली आहे. दरम्यान सलमानला आलेला धमकीचा ईमेल पाठवल्यामुळे पोलिसांनी एका आरोपीला अटक केली होती. त्याचं नाव धाकडराम बिश्नोई असं आहे.सलमान खानला धमकावल्याप्रकरणी अटक करण्यात आलेला आरोपी धाकडराम बिश्नोईला सोमवारी वांद्रे दंडाधिकारी न्यायलयाने 7 दिवसांची म्हणजे 3 एप्रिल पर्यंत पोलीस कोठडी सुनावली.त्याला रविवारी जोधपूर येथून अटक केल्यानंतर सोमवारी त्याला न्यायालयात हजर करण्यात आले. आरोपीने न्यायलायसमोर चुकी मान्य करत मेल चुकून पाठवण्यात आल्याचं आरोपींनी सुनावणीदरम्यान सांगितलं





# न्यासाचं वयच काय?

बॉलिवूड अभिनेता अजय देवगण आणि काजोल यांची यांनी त्याच्या अभिनयाने मनोरंजन विश्वात वेगळीच ओळख निर्माण केली आहे. अजूनही काजोलची क्रेझ कायम आहे.

मात्र केवळ काजोल आणि अजयचं नाही तर त्याची मुलगी न्यासा देवगण ही देखील नेहमीच चर्चेत असते. न्यासा सोशल मीडियावर खूप सक्रिय आहे. तिच्या चाहत्यांची संख्याही खुप आहे.अनेकदा ती पार्टी आणि इव्हेंटमध्ये स्पॉट केली जाते आणि ड्रेसमुळे चर्चेत राहते. अनेकवेळा तिच्या ड्रेसिंग सेन्समुळे तिला सोशल मीडियावर खूप ट्रोल देखील केले जाते. तर कधी नेपोकिड म्हणुनही तिला ट्रोल केले जाते.मात्र, अजय आणि काजोल नेहमी न्यासाला ट्रोलिंगकडे विशेष लक्ष देऊ नकोस असा सल्ला देतात. तर न्यासाही टिकेकडे दुर्लक्ष करते. त्याचवेळी, आता एका कार्यक्रमात काजोलने तिची मुलगी न्यासा हिच्या लोकप्रियतेवर प्रतिक्रिया दिली आहे.Sकाजोल ही तिच्या मुलीला मिळालेल्या लोकप्रियतेमुळे खुप खुश आहे. असं नुकतच तिनं असं एका कार्यक्रमात सांगितलं आहे. काजोल म्हणाली, 'मला तिचा अभिमान वाटतो यात काही शंका नाही. मला तिची एक गोष्ट खुप आवडते ती म्हणजे न्यासा कुठेही गेली तरी ती आत्मविश्वासाने तिथे स्वत:ला सिद्ध करते.



# सोनालीला राहवलंच नाही, अमेरिकेतही तिनं...

मराठी, हिंदी मनोरंजन विश्वात आपल्या वेगळ्या धाटणीच्या अभिनयानं सोनालीनं नेहमीच प्रेक्षकांची वाहवा मिळवली आहे. सोनाली ही अभिनयाबरोबरच तिच्या परखड वक्तव्यासाठी ओळखली जाते. गेल्या काही दिवसांपूर्वी तिनं एका मुलाखतीमध्ये दिलेल्या प्रतिक्रियेनं ती चर्चेत आली होती. आता सोनालीचा एक व्हिडिओ व्हायरल झाला आहे. सोनालीनं थेट अमेरिकेतील रेल्वे स्टेशनवर शुट केलेला तो व्हिडिओ चाहत्यांची पसंती मिळवताना दिसतो आहे. त्यावर आलेल्या प्रतिक्रिया देखील भलत्याच भन्नाट आहे. गेल्या काही दिवसांपासून सोनाली वेगवेगळ्या कारणामुळे चर्चेत आली आहे. भारतातील मुली या आळशी आहेत असं विधान करुन तिनं नेटकऱ्यांचे लक्ष वेधून घेतले होते. त्यानंतर सोशल मीडियावर सोनालीवर झालेल्या टीकेनं तिला तिच्या विधानावरुन माफीही मागावी लागली होती.

सोनालीनं सोशल मीडियावर आपल्या त्या विधानावरुन दिलगिरीही व्यक्त केली होती. सोनालीच्या नव्या व्हिडिओनं चाहत्यांनी तिच्यावर कौतूकाचा वर्षाव केला आहे.तो व्हिडिओ शेयर करताना सोनालीनं लिहिलं आहे की, राहवलंच नाही.. केलंच रील, ते ही अमेरिकेत. हा मधुमास नवा....या गाण्यावर सोनालीनं केलेल्या रिल्सला चाहत्यांचा मोठा प्रतिसाद केला आहे.



# शतक हुकले, पण इतिहास रचला!

## चितगावमध्ये लिटन दास नावाचं वादळ, 13 चेंडूत ठोकल्या 58 धावा

।चेन्नई, । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**बांगलादेश विरुद्ध आयर्लंड यांच्यातील टी-20 मालिकेतील दुसरा सामना 29 मार्चला चितगाव येथे खेळवला जात आहे. या सामन्यात बांगलादेशचा सलामीवीर फलंदाज लिटन दासने वेगवान फलंदाजी करत इतिहास रचला आहे.**

टी-20 फॉरमॅटमध्ये सर्वात जलद अर्धशतक झळकावणारा तो बांगलादेश संघाचा पहिला फलंदाज ठरला आहे. त्याच्या आधी माजी क्रिकेटपटू मोहम्मद अश्रफुलच्या नावावर हा विशेष विक्रम नोंदवला गेला होता. अश्रफुलने 20 चेंडूत हा पराक्रम केला.

दुसऱ्या टी-20 सामन्यात बांगलादेशचा सलामीवीर फलंदाज लिटन दास जबरदस्त फॉर्ममध्ये दिसला. उजव्या हाताच्या फलंदाजाचे शतक हुकले, पण इतिहास रचला. आपल्या संघासाठी डावाची सुरुवात करताना त्याने अवघ्या 18 चेंडूत अर्धशतक झळकावले. या सामन्यात त्याने आपल्या संघासाठी एकूण 41 चेंडूंचा सामना केला. यादरम्यान त्याच्या बॅटमधून 202.43 च्या सरासरीने 83 धावा निघाल्या.



»दुसऱ्या टी-20 सामन्यात बांगलादेशचा सलामीवीर फलंदाज लिटन दास जबरदस्त फॉर्ममध्ये दिसला. उजव्या हाताच्या फलंदाजाचे शतक हुकले, पण इतिहास रचला. आपल्या संघासाठी डावाची सुरुवात करताना त्याने अवघ्या 18 चेंडूत अर्धशतक झळकावले. या सामन्यात त्याने आपल्या संघासाठी एकूण 41 चेंडूंचा सामना केला. यादरम्यान त्याच्या बॅटमधून 202.43 च्या सरासरीने 83 धावा निघाल्या.

दासने या सुरेख खेळीत एकूण 10 चौकार आणि 3 षटकार मारले आहेत. म्हणजेच 13 चेंडूत 58 धावा ठोकल्या. बांगलादेशसाठी टी-20 क्रिकेटमध्ये सर्वात जलद अर्धशतक झळकावणारा सर्वात वेगवान फलंदाज ठरला.

लिटन दासच्या आधी बांगलादेशसाठी टी-20 फॉरमॅटमध्ये सर्वात जलद अर्धशतक झळकावण्याचा विशेष विक्रम माजी क्रिकेटपटू मोहम्मद

# दिल्ली कॅपिटल्सला मिळाला ऋषभचा बदली खेळाडू

## ‘हा’ युवा यष्टीरक्षक-फलंदाज घेणार पंतची जागा

। नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**आयपीएलच्या १६वा हंगाम सुरू होण्यापूर्वी दिल्ली कॅपिटल्सच्या कॅम्पमधून मोठी बातमी समोर आली आहे. स्पर्धा सुरू होण्यापूर्वी ऋषभ पंतच्या बदली खेळाडूची घोषणा करण्यात आली आहे. ऋषभ पंतच्या जागी बंगालचा यष्टीरक्षक फलंदाज अभिषेक पोरेलचा संघात समावेश करण्यात आला आहे. दिल्ली कॅपिटल्सचा नियमित कर्णधार ऋषभ पंत सध्या कार अपघातात झालेल्या दुखापतीतून सावरत आहे. त्याच्या जागी संघाने आगामी हंगामासाठी डेव्हिड वॉर्नरची कर्णधारपदी निवड केली आहे, तर अक्षर पटेलला उपकर्णधारपद देण्यात आले आहे.**



बंगालचा यष्टिरक्षक फलंदाज अभिषेक पोरेलने देशांतर्गत क्रिकेटमध्ये चांगली कामगिरी केली आहे. पीटीआयच्या मते, तो आयपीएल २०२३ मध्ये दिल्ली कॅपिटल्सकडून खेळताना दिसणार आहे. तो संघात ऋषभ पंतच्या जागा घेईल. २१ वर्षीय पोरेलने १६ प्रथम श्रेणी सामने, तीन लिस्ट ए सामने आणि तीन टी-20 सामने खेळले आहेत. डाव्या हाताच्या फलंदाजाने फेब्रुवारी २०२३ मध्ये प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये पदार्पण केले. त्याने ३०.२१च्या सरासरीने ६९५ धावा केल्या आहेत. यादरम्यान त्याने ६ अर्धशतके झळकावली आहेत.पोरेलने रणजी ट्रॉफीमध्ये बंगालसाठी चांगली कामगिरी केली होती. त्याने ग्रुप स्टेजमध्ये हरियाणाविरुद्ध ४९ धावा केल्या होत्या. उपांत्य फेरीत मध्य प्रदेशविरुद्ध ५१ आणि अंतिम फेरीत सौराष्ट्रविरुद्ध ५० धावा केल्या होत्या. पीटीआयच्या रिपोर्टरनुसार, पोरेलने सराव सामन्यात चांगली कामगिरी केली आहे. तो खूप काही शिकू शकणारा तरुण आहे. दिल्ली कॅपिटल्सच्या

### कोण आहे अभिषेक पोरेल?

»अभिषेक पोरेल हा बंगालचा युवा यष्टिरक्षक फलंदाज आहे. तो देशांतर्गत क्रिकेटमध्ये बंगालचे प्रतिनिधित्व करतो. यष्टिरक्षणा व्यतिरिक्त तो डावखुरा फलंदाज आहे. तो गेल्या वर्षी भारताच्या अंडर-१९ विश्वचषक विजेत्या संघाचा सदस्य होता. तो अतिशय प्रतिभावान खेळाडू मानला जातो. यापूर्वी, दिल्ली कॅपिटल्सचे मुख्य प्रशिक्षक रिकी पॉंटिंग यांनी पंतच्या बदलीसाठी काही यष्टीरक्षकांच्या चाचण्या घेतल्या होत्या. त्यात अभिषेक पोरेलचाही समावेश होता. त्यानंतर त्याचा दिल्ली कॅपिटल्सच्या संघात समावेश करण्यात आला.

### आयपीएल 2023 साठी दिल्ली कॅपिटल्स संघ

» अक्षर पटेल, पृथ्वी शॉं, एनरिक नोरखिया, डेव्हिड वॉर्नर (कर्णधार), मिचेल मार्श, सरफराज खान, कमलेश नागरकोटी, मुस्तफिजुर रहमान, कुलदीप यादव, खलील अहमद, चेतन साकारिया, ललित यादव, रिपल पटेल, यश धुल, रोवमन पॉवेल, प्रवीण दुबे, लुंगी एनगिडी, विकी ओस्तवाल, अमन खान, फिल सॉल्ट, इशांत शर्मा, मुकेश कुमार, मनीष पांडे, रिले रोसौ, अभिषेक पोरेल२०२१ मध्ये जोडल्यानंतर आयपीएल २०२२ पूर्वी त्याला मुक्त केले. यानंतर तो मेगा ऑक्शनमध्ये अनसोल्ड राहिला. अखेर तो आता आयपीएलपासून दूर झाला आहे. २०२१ च्या हंगामात त्याने ८ सामन्यात केवळ १५२ धावा केल्या. यादरम्यान त्याची सरासरी २५.३३ आणि स्ट्राइक रेट ११२ आहे.

# भारताच्या ‘या’ खेळाडूंनीही मारली बाजी



। नवी दिल्ली। महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

आयपीएलचा १६ वा सीजन ३१ मार्च २०२३ पासून सुरु होणार असून नरेंद्र मोदी स्टेडियमवर गुजरात टायटन्स आणि सीएसके यांच्यात पहिला सामना रंगणार आहे. जगात सर्वात श्रीमंत टूर्नामेंट म्हणून इंडियन प्रीमियर लीगकडे पाहिलं जातं. या आयपीएलमध्ये दिग्गज खेळाडूंना कोट्यावधी रुपये देऊन खरेदी केलं जातं. खेळाडूंच्या संपूर्ण क्रिकेट करिअरचा आढावा घेऊन आयपीएलच्या लिलावात खेळाडूंवर बोली लावली जाते. अशातच आम्ही तुम्हाला आयपीएल इतिहासातील सर्वात महागड्या खेळाडूंबाबत सविस्तर माहिती सांगणार आहेत.

इंग्लंडचा स्टार अष्टपैलू खेळाडू सॅम करन यंदाच्या आयपीएल २०२३ मधील सर्वात महागडा खेळाडू ठरला आहे. पंजाब किंग्जने सॅम करनला १८.५० कोटी रुपयांत खरेदी केलं आहे. तर ऑस्ट्रेलियन खेळाडू कॅमरून ग्रीन दुसरा महागडा खेळाडू ठरला असून मुंबई इंडियन्सने ग्रीनला १७.५ कोटी रुपयांत खरेदी केलं. दरम्यान, आयपीएल इतिहासात आतापर्यंत कोणते खेळाडू कोट्यावधी रुपयांच्या घरात पोहोचले, याबाबत जाणून घेऊयात सविस्तर माहिती..आयपीएल इतिहासातील सर्वात महागडे खेळाडू

१) सॅम करन - पंजाब किंग्ज, १८.५० कोटी, IPL 2023

२) इशान किशन - मुंबई इंडियन्स, १५.२५ कोटी, IPL 2022

३) ख्रिस मॉरिस - राजस्थान रॉयल्स, १६.२५ कोटी, IPL 2021

४) पॅट कमिन्स - कोलकाता नाईट रायडर्स, १५.५ कोटी, IPL 2020

५) जयदेव उनादकट, राजस्थान रॉयल्स, वरुण चक्रवर्ती,